## चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्रात जागतिक पर्यावरण दिन उत्साहात साजरा




चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्रात जागतिक पर्यावरण दिन दिनांक ५ आणि ६ जून २००९ ला मोठ्या उत्साहात संपन्न झाला. पर्यावरण दिनाचे औचित्य साधून दिनांक ५ जून २००९ ला प्रभारी मुख्य महाव्यवस्थापक, श्री.कार्तिक वाघमारे, महाव्यवस्थापक श्री.सिद्धार्थ वाघमारे, मुख्य अग्निशमन अधिकारी श्री.हरिदास चौधरी व सर्व अधीक्षक अभियंते यांच्या हस्ते ऊर्जाभवनलगत मोटघाट नाल्याच्या शेजारी वृक्षारोपण करण्यात आले.

दिनांक ६ जून २००९ ला मुख्य महाव्यवस्थापक श्री.विजय सिंग यांचे अध्यक्षतेखाली पर्यावरण दिनाचा मुख्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून श्री.व्ही.व्ही. शिंदे, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर तर प्रमुख वक्ते श्री.डी.पाल, कार्यकारी संचालक, एमईएल, चंद्रपूर हे उपस्थित होते. याप्रसंगी आपल्या अध्यक्षीय भाषणात श्री.सिंग यांनी पर्यावरणाची हानी टाळण्यासाठी व वाढत्या प्रदूषणामुळे पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील याची ग्वाही दिली.

अधीक्षक अभियंता श्री.राजेंद्र कुळकर्णी यांनी प्रास्ताविक तर अहवाल कार्यकारी रसायन शास्त्रज्ञ श्री.ए.डी. पाटील यांनी सादर केला. यानंतर श्री.सिद्धार्थ वाघमारे, महाव्यवस्थापक यांनी वसुंदरेला प्रदूषणामुळे होणाऱ्या अध:पतनापासून वाचविण्यासाठी 'झाडे लावा झाडे जगवा' अशी शपथ उपस्थितांना दिली.

कार्यक्रमादरम्यान श्री.मोरेश्वर मडावी, राजेंद्र पोईनकर, उंटा यांच्या चमूने वाद्यवृंदाच्या तालात स्वागतगीत व पर्यावरण गीत सादर केले.




प्रमुख पाहुणे श्री.व्ही.व्ही. शिंदे यांनी चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्रामध्ये संच क्र. ८ व ९ प्रस्तावित आहे, त्याअनुषंगाने लगतच्या दुर्गापूर आणि तुकुम या ठिकाणी रहिवाशांची संख्या वाढत असल्यामुळे प्रदूषणाचा त्यांच्या आरोग्यावर परिणाम होणार नाही व एकंदरच प्रदूषणावर आळा घालण्यासाठी म.प्र.नि. मंडळाने ॲक्शन प्लानच्या अंतर्गत विविध प्रभावी उपाययोजना करण्याचे प्रतिपादन केले.

प्रमुख वक्ते श्री.डी.पाल. यांनी प्रदूषण कमी करण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर कोणकोणत्या उपाययोजना करण्यात येत आहेत याबद्दल शास्त्रीय व अभ्यासपूर्ण माहिती सादर केली. तसेच 'युनाईट टू कॉम्बॅट क्लाईमेट चेंज' या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. चं.म.औ.वि. केंद्र सद्यपरिस्थितीत प्रदूषणावर आळा घालण्यासाठी करीत असलेल्या कामगिरीबद्दल त्यांनी गौरवोद्‌गार काढले.

पर्यावरण विभागाने लोकांमध्ये जागृती व्हावी म्हणून घोषवाक्य स्पर्धेचे आयोजन केले होते. यशस्वी स्पर्धकांना व गीत गायकांना मुख्य महाव्यवस्थापक श्री.विजय सिंग तर्फे प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात आले.

**ATTENTION PLEASE**

## MAHAGENCO'S PROFESSIONAL FORUM

### Professional Forum Objectives

Mahagenco intends to use this forum as a common platform for their employees, officers (present & past) and management and also outside professionals from Power utilities to participate and share their knowledge and experience in the field. This forum is aimed at achieving the following objectives.

- ★ Encourage the employees to communicate and express freely on professional & organizational issues, leading to improvements.
- ★ Educate and enhance the knowledge of MAHAGENCO employees.
- ★ Identify talent & experts in MAHAGENCO, in Industry.
- ★ Find quick and easier solutions to problems.
- ★ Obtain the benefits of experience & knowledge from industry experts and share the experiences of MAHAGENCO employees with them.

### Procedure to Register for MAHAGENCO's Professional Forum (For MAHAGENCO Employees)

**Step 1:** Go to http://www.mahagenco.in . Click on the FORUM Link.

**Step 2:** Click on the "REGISTER" Link available at left – center portion of the index page.

**Step 3:** Click on "I Agree to Terms".

**Step 4:** Fill The Form for new registration available on registration page which includes following fields:

a) Username:
b) E-mail address:
c) Confirm e-mail address:
d) Password:
e) Confirm password:
f) Language: g) Time zone:
h) Full Name:
i) CPF Number: j) Designation:
k) Office Location:
l) Confirmation Code:

**Step 5:** Following Message will be displayed on successful account creation:

"Your account has been created. However, it requires account activation by the administrator. An e-mail has been sent to them and you will be informed when your account has been activated."

**Step 6:** Check your email (Provided by you while filling registration form) for further action.

**Note:-**

1) Email Id provided by you is the primary medium of communication, So it is advised to enter proper Email Id.

This Professional Forum of MAHAGENCO is currently accepting new registration only for MAHAGENCO Employees. Other Professionals are requested not to register by above procedure.